**महाराष्ट्र राज्यातील एलपीजी (LPG) गॅस सिलेंडर पुरवठा नियमित ठेवणे, संभाव्य तुटवडा परिस्थितीचे व्यवस्थापन करणे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क.४५/नापु-२७**
मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १३ मार्च, २०२६

**संदर्भ:-१. केंद्र शासन आदेश क्र. M१३०१७ (११)/१/२०२६-LPG-PNG, दि. ०९.०३.२०२६ रोजीचे आदेश**
**२. केंद्र शासनाची दि. ०९.०३.२०२६ रोजीची अधिसूचना**

## परिपत्रक

सध्या मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थिती विचारात घेता एलपीजी व इतर पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केंद्रशासनामार्फत करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने, केंद्रशासनामार्फत तेल उत्पादक व विपनण कंपन्यांना आवश्यक त्या सूचना संदर्भाधीन आदेशान्वये देण्यात आलेल्या आहेत.

राज्यात एलपीजी साखळी नियमित ठेवण्यासाठी, संभाव्य तुटवडा परिस्थितीचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये निर्माण होणारी अनावश्यक भितीचे वातावरण टाळण्यासाठी पुढील उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

१. एलपीजी पुरवठा सुरळीत राहावा, पुरवठा साखळीवर देखरेख ठेवावी व संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा यासाठी मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये तसेच जिल्हा स्तरावर पुढीलप्रमाणे विशेष समित्या स्थापन करण्यात याव्यात.

**अ. जिल्हास्तरीय विशेष समिती:-**

| अ.क्र. | समितीमधील सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त | सदस्य-सचिव |

| | | |
|---|---|---|
| ३ | जिल्हा पुरवठा अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित जिल्ह्यातील महानगरपालिका आयुक्त/आयुक्त यांचे प्रतिनिधी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी. | सदस्य |
| ५ | सर्व सरकारी तेल कंपन्यांचे प्रतिनिधी (OMC) | सदस्य |
| ६ | गॅस वितरण एजन्सीचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | आवश्यकतेनुसार इतर संबंधित अधिकारी | सदस्य |

**ब. मुंबई महानगर परिक्षेत्रातील विशेष समिती:-**

| अ.क्र. | समितीमधील सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (अध्यक्ष) | अध्यक्ष |
| २ | पोलीस सह आयुक्त,बृहन्मुंबई, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३ | मुंबई महानगर परिक्षेत्रातील महानगरपालिका आयुक्त/त्यांचे प्रतिनिधी, व नगरपालिकांचे मुख्याधिकारी | सदस्य |
| ४ | उपनियंत्रक (रेशनिंग) | सदस्य-सचिव |
| ५ | तेल कंपन्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | गॅस वितरण एजन्सीचे प्रतिनिधी | सदस्य |

(संबंधित क्षेत्राचे व्यवस्थापक/तेल कंपन्यांचे प्रतिनिधी जिल्ह्यात उपलब्ध नसल्यास त्यांना व्हीडीओ कॉन्फरसींग (VC) द्वारे बैठकीस उपस्थित राहण्यास अनुमती द्यावी.)

**२. विशेष समितीमार्फत करावयाचे कार्य:-**

i. एलपीजी पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे.
ii. वितरण व्यवस्थेचा नियमित आढावा घेणे.
iii. गॅस वितरणात येणाऱ्या संभाव्य अडचणी दूर करणे
iv. जिल्हयामध्ये/ महानगरपालिका क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे.

v. ग्राहकांना घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवणे.
vi. गॅस एजन्सीकडे असणाऱ्या गॅस सिलेंडर साठ्याचा आढावा घेणे.
vii. साठेबाजी रोखणे
viii. घरगुती गॅस चा काळाबाजार होणार नाही, याची दक्षता घेणे.
ix. घरगुती गॅसची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, यांची दक्षता घेणे.

३. पुढील अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या संस्थांना एलपीजी पुरवठा करण्यात प्राधान्य देण्यात यावे.

i. रुग्णालये,
ii. शासकीय वसतिगृहे,
iii. अंगणवाडी व शाळा मध्यान्ह भोजन योजना
iv. शासकीय आश्रमशाळा/ वसतिगृहे
v. महाविद्यालयांच्या मेस, मध्यान्ह भोजन योजना,

४. गॅस वितरणाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हा स्तरावर व महानगर स्तरावर २४/७ सुरु असणारा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा.

५. जिल्हा तक्रार निवारणासाठी आपत्कालीन दुरध्वनी क्रमांक/हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच, व्हाट्सअप क्रमांक उपलब्ध करुन द्यावा. सदर क्रमांकास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. उपरोक्त नियंत्रण कक्षामार्फत सदर क्रमांकावर प्राप्त तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

६. प्रत्येक जिल्ह्यातील गॅस वितरण करणाऱ्या एजन्सींकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या एलपीजी साठ्याबाबत दैनिक माहिती घेण्यात यावी.

७. जिल्ह्यामधील इंधन पुरवठ्याच्या अनुषंगाने दैनिक आढावा घेण्यात यावा. जिल्ह्यातील पेट्रोल, डिझेल व एलपीजी पीएनजी यांच्या साठ्याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये दुपारी १२.०० वाजेपर्यंत शासनास सादर करण्यात यावी.

८. जिल्हा स्तरावर वितरण स्थिती व संभाव्य अडचणींचा दैनिक आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात यावा.

९. गॅस पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्यास कोळसा, रॉकेल इत्यादी पर्यायी इंधन वापरण्याच्या शक्यता तपासण्यात यावी.

१०. जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधन वापरासाठी प्रोत्साहन द्यावे.

११. ग्रामपंचायत तसेच तालुका स्तरावर लोकप्रतिनीधी /सामाजिक संस्था, संघटना यांचे प्रतिनीधी यांचा समावेश करुन व्हॉट्सॲपचे गट निर्माण करण्यात यावेत व त्याद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी.

१२. एलपीजी वाहतूक व वितरण करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना व वितरक कर्मचाऱ्यांना आवश्यक ते पोलीस संरक्षण देण्यात यावे.

१३. घरगुती गॅसचा अवैध वापर, साठेबाजी व काळाबाजार यासारख्या अनियमितता करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

१४. घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर ही जीवनावश्यक बाब असल्याने उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१५. सदर परिपत्रक हे सद्यपरिस्थिती पूर्ववत होईपर्यंत लागू राहील.

१६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०३१४१२३७२११२०६ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.03.14 14:15:27 +05'30'

**(अशोक आत्राम)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा.उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा.अध्यक्ष, विधानसभा,विधानभवन, मुंबई.
७. मा.उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
१०.मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
११.मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१२.मा.राज्यमंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
१३.अपर मुख्य सचिव (अनापुवग्रासं), मंत्रालय,मुंबई.

१४.अपर मुख्य स.चिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५.अपर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.अपर मुख्य सचिव (नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.अपर मुख्य सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८.अपर मुख्य सचिव कृषी व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.अपर मुख्य सचिव (परिवहन) गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
२०.प्रधान सचिव/महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२१.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
२४.सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२७.संचालक, नगरपालिका प्रशासन संचनालय.
२८. सर्व विभागीय आयुक्त
२९.सर्व महानगरपालिका आयुक्त
३०.सर्व पोलीस आयुक्त
३१.सर्व जिल्हाधिकारी
३२.सर्व पोलीस अधिक्षक
३३.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
३४.राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई.
३५.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
३६.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
३७.निवडनस्ती (नापु-२७)

## विवरणपत्र

दिनांक ------- रोजीचा अहवाल

| अ.क्र. | पेट्रोलियम पदार्थ | एकूण साठा | एकुण विक्री | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|
| १. | पेट्रोल | | | |
| २ | डिझेल | | | |
| ३. | एलपीजी | | | |
| ४. | पीएनजी | | | |